# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१८/०६/२०१६.

**१) मोटार पंपची चोरी. :–**

दिनांक १६/०६/२०१६ रोजी १७.०० वा. ते दि. १७/०६/०१६ रोजी ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी यादोराव बिसन चेटुले वय ६१ वर्ष, रा. दिघोरी यांच्या साखरा येथील शेतातील विहीरीवर १ एच.पी. मोटार पंप सि.आर.आय कंपनीची मोटार व १५० फुट डिलेव्हरी वायर व सेक्शन रबरी पाईप २० फुट असा एकुण कि. १०,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुण चोरून नेला. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**२) ट्रेंडर्स दुकानातील सलाखिंची चोरी. :–**

दिनांक १७/०६/०१६ रोजी ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी अर्जुन रामचंद्र काटवले वय ४८ वर्ष, रा. कान्द्री यांच्या काटवले ट्रेडर्सच्या समोरील वॉल कंपाऊडच्या खुल्या जागेत ठेवलेल्या लोखंडी सलाकी २५०० किलो व फिर्यादीचे भाऊ शिवाजी काटवले यांच्या मयुर ट्रेडर्स दुकाना समोरील खुल्या जागेत ठेवलेल्या ५०० किलो अश्या एकुण ३,००० किलो सलाखी कि. ९०,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुण त्यांच्या ट्रक मध्ये भरून चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सपोनि. झोटिंग पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) घरातुन पिस्टल व राऊंडची चोरी. :–**

दिनांक १६/०६/०१६ रोजी १५.०० वा. ते दि. १७/०६/०१६ रोजी १५.०० वा. दरम्यान फिर्यादी राजेंद्र मधुकर बन्सोड वय ४७ वर्ष, रा. विद्या नगर गुजराती कॉलनी भंडारा यांच्या मोठया भावाच्या विद्यानगर गणेशपुर भंडारा येथील घराच्या खिडकीचे लोखंडी ग्रील वाकवुन आत प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुण बेडरूम मधील बेडच्या ड्रॉप मधुन १ पिस्टल व ५ राऊंडसह कि. ६२,०००/–रु. चा माल चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १७/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०३ केसस, तिन सिटर वाहनांवरती १८ केसेस व इतर वाहनांवरती १४६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

ok 18/6/16